ePaper

**स्मारकाआधीच वादाची ठिणगी; बाळासाहेबांच्या स्मारकात वैयक्तिक बैठका नकोत : फडणवीस**



| वर्ष - 6 | अंक - 214 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीची हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार | दिनांक 17 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्टार प्रचारक यादीतून खासदार अमोल कोल्हे गायब
- भाजपाकडून 'सिनेट' निवडणुकीची जोरदार तयारी
- माणुसकीच्या खांडोळ्या


# कंत्राटी कामगारांचा आक्रोश!

## महापालिकेवर थाळीनाद : ...तर येणाऱ्या निवडणुकीत धडा शिकवू!

| पिंपरी-चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये सोळाशे पेक्षा अधिक महिला कामगार कंत्राटी पद्धतीने साफसफाईची कामे करत आहेत. यासह इतर ९ हजार पेक्षा अधिक कामगार कंत्राटी पद्धतीने काम करतात. ही कंत्राटी पद्धत बंद करून कामगारांना कायम करावे. ठेकेदाराकडून होणारे अन्याय अत्याचार थांबवण्यासाठी कडक उपयोजना कराव्यात. कामावरून काढण्यात आलेल्या सर्व कामगारांना पुन्हा कामावर घ्यावे. दिवाळी बोनससह कामगारांना मिळणारे सर्व लाभ द्यावेत. मागील फरक व कायम कामगारांप्रमाणे वेतन व सुविधा मिळाव्यात. पीएफ आणि ईएसआयचा लाभ मिळावा. पगाराची स्लिप देणे गरजेचे आहे. या मागण्या मान्य करून गोरगरीब जनतेवरील अन्याय दूर करावा. हे प्रश्न न सोडविता कष्टकऱ्यांवर अन्याय कराल तर येणाऱ्या निवडणुकीत धडा शिकवू, असा परखड इशारा कष्टकरी कामगार पंचायतचे अध्यक्ष कष्टकऱ्यांचे नेते बाबा कांबळे यांनी दिला.**



पिंपरी चिंचवड महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी कष्टकरी कामगार पंचायतच्या वतीने महापालिका प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करत थाळी नाद करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या वेळी घरकाम महिला सभा अध्यक्षा आशा कांबळे, कष्टकरी कामगार पंचायतच्या सरचिटणीस मधुरा डांगे, उपाध्यक्ष अनिल गाडे आदींसह महिला व पुरुष सफाई कामगार व संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या वेळी कामगार कपात करणार नसल्याचे व ज्या कामगारांना काम काढले त्यांना ताबडतोब कामावर घेण्याची आश्वासन आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. बाबा कांबळे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये कायम कामगारांना दीड लाखापेक्षा अधिक बोनस मिळाला आहे. परंतु ज्या सफाई कामगार महिलांनी शहर स्वच्छ ठेवण्यात योगदान दिले, शहरांमध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये मानांकन मिळवून देण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले, सकाळी सहा ते रात्री दहापर्यंत काम केले, अशा सफाई कामगार महिलांना दिवाळीत बोनसपासून वंचित ठेवण्यात आले. ही श्रीमंत महापालिकेसाठी लाजिरवाणी गोष्ट आहे.

### लोकप्रतिनिधींच्या घरासमोर आंदोलन छेडू -

महापालिकेच्या निवडणुका होऊ घातलेल्या आहेत. शहरातील लोकप्रतिनिधी सफाई कामगारांच्या या प्रश्नावर बघ्याची भूमिका घेत आहेत. गोरगरीब कष्टकऱ्यांना न्याय देण्यासाठी पुढे येत नाहीत. याचे कारण देखील समजत नाही. शहरामध्ये हजारो कष्टकरी कामगार आहेत. त्यामध्ये सफाई कामगार, कंत्राटी कामगार, रिक्षा चालक, फेरीवाले या सर्व कष्टकऱ्यांवर अन्याय सुरू आहेत. लोकप्रतिनिधींनी बघ्याची भूमिका न घेता प्रश्न सोडविण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन बाबा कांबळे यांनी केले.

### जेलमध्ये टाकले तरी लढा तीव्र करू

सफाई कामगारांच्या हक्काची लढाई तीव्रपणे लढणार आहे. अनेकदा महापालिका प्रशासन, पोलिसांमार्फत आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न करतात. मात्र कर्मचाऱ्यांच्या आंदोलनासाठी जेलमध्ये जावे लागले तरी चालेल. मात्र हक्काच्या मागण्यांसाठी मागे हटणार नाही. या पुढे अन्याय अत्याचार अजिबात सहन करणार नसल्याचे बाबा कांबळे म्हणाले.

---

## सदनिकाधारकांना दिलासा देण्याची भूमिका

# 'पार्किंग'साठी विकसकांची नियमावली कडक करा!

## आमदार महेश लांडगे : राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडे मागणी



| पिंपरी-चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

सर्वसमावेशक आणि एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) २०२० मधील वाहनतळाच्या विनियम तक्ता क्र. ८ बीमध्ये सुधारणा करून सोसायटींमध्ये क्लोज सर्किट कॅमेरे बसवण्याच्या नियमाचा समावेश करावा. तसेच बांधकाम परवानगी नियमांमध्ये आवश्यक ते बदल करुन विकासकांकडून कोणतेही अतिरिक्त अधिमूल्य न आकारता प्रत्येकी निवासी फ्लॅटधारकांसाठी किमान एक कार व २ दुचाकी पार्किंग बंधनकारक करावे, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत राज्य सरकारच्या नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांना पत्र दिले आहेत. त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीप्रमाणे संपूर्ण राज्यात दि. २ डिसेंबर २०२० रोजी सर्वसमावेशक आणि एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागू करण्यात आली आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली, मोशी, डुडूळगाव, चऱ्होली, वडमुखवाडी, चोविसावाडी, दिघी आदी क्षेत्र हे पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समाविष्ट आहे. या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प उभे राहत आहेत. बहुतांश प्रकल्पातील निवासी गाळे हे छोट्या अल्प ते मध्यम उत्पन्न गटातील आहेत.

### सोसायटींमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करा...

**तसेच, बांधकाम परवानगी नियमांमध्ये आवश्यक ते बदल करुन विकासकांकडून कोणतेही अतिरिक्त अधिमूल्य न आकारता प्रत्येकी निवासी फ्लॅटधारकांसाठी किमान एक कार व २ दुचाकी पार्किंग बंधनकारक करावे. जेणेकरून पार्किंगचे प्रश्न सुटतील. तसेच, दिवसेंदिवस शहरी निवासी भागात चोऱ्यांचे व लुटमारीचे प्रमाण वाढलेले आहे. तरी हौसिंग सोसायटींमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे सह सुरक्षा यंत्रणा बसवणे बंधनकारक करावे. त्याबाबत बांधकाम नियमावलीमध्येदेखील या बाबींचा समावेश करावा. तसेच, बरेच बांधकाम व्यावसायिक महापालिकेकडून बांधकाम पूर्णत्वाचा दाखला/भोगवटा घेत नाही. त्यामुळे नागरिकांना अडचणी निर्माण होतात. परिणामी अशा बांधकाम व्यावसायिकांच्या नवीन गृहप्रकल्पांना बांधकाम परवानगी न देण्याबाबत नियमावली करण्याबाबत विचार करावा, अशी सूचनाही आमदार लांडगे यांनी केली आहे.**

# एनसीपीच्या स्टार प्रचारक यादीतून खासदार अमोल कोल्हे गायब

## राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्या काही दिवसांपासून नाराजी नाट्याच्या अनेक बातम्या समोर

**पुणे । महाईन्यूज ।**



महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाची बातमी समोर आलीय. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्या काही दिवसांपासून नाराजी नाट्याच्या अनेक बातम्या समोर येत आहेत. विरोधी पक्षनेते अजित पवार नाराज असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. पण त्यांनी प्रसारमाध्यमांसमोर येत आपण नाराज नसल्याचं स्पष्ट केलं होतं. त्यानंतर शिरुर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे नाराज असल्याची बातमी समोर आली होती. या बातमीवर कोल्हेंनीदेखील नाराज नसल्याची प्रतिक्रिया दिली होती. पण त्यांच्या नाराजीच्या वृत्ताला खतपाणी घालणारी आणखी एक बातमी समोर आलीय. अमोल कोल्हे यांचं नाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्टार प्रचारक यादीतून गायब झालंय. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून स्टार प्रचारक यादी जाहीर करण्यात आलीय.पण या स्टार प्रचारकांच्या यादीतून अमोल कोल्हे यांचं नाव गायब झालंय. त्यामुळे कोल्हे राष्ट्रवादी काँग्रेसमधून नाराज असल्याच्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आलंय.

राष्ट्रवादी काँग्रेसचं काही दिवसांपूर्वी शिर्डीत चिंतन शिबिर पार पडलं होतं. या शिबिरात पक्षाध्यक्ष शरद पवार हे आजारी असून हाताला बँडेज बांधून पोहोचले होते. पण या कार्यक्रमाला अमोल कोल्हे उपस्थित नव्हते. त्यामुळे अमोल कोल्हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नाराज असल्याची बातमी समोर आली होती.

दुसरीकडे अमोल कोल्हेंनी प्रकृती बरी नसल्याने आपण कार्यक्रमाला उपस्थित राहू शकलो नव्हतो. याबाबत आपण पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना सांगितलं होतं, अशी प्रतिक्रिया अमोल कोल्हे यांनी दिली होती.

### अमोल कोल्हेंची अमित शहा यांना भेट

अमोल कोल्हे यांनी नुकतंच काही दिवसांपूर्वी 'शिवप्रताप गरुड झेप' या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी चित्रपटाच्या प्रमोशनासाठी भेट घेतल्याचं स्वत: स्पष्ट केलं होतं.

### अमोल कोल्हेंची देवेंद्र फडणवीस यांना भेट

याशिवाय अमोल कोल्हे यांनी काही दिवसांपूर्वी पुणे नाशिक रेल्वे प्रकल्प, चाकण येथे होणारा इंद्रायणी मेडिसिटी प्रकल्प या संदर्भात चर्चा करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली होती.

---

# नवीन ग्रंथालयांसाठी अर्ज स्वीकारण्यास सुरवात करणार - चंद्रकांत पाटील

**पुणे । महाईन्यूज ।**



वाचन संस्कृती वृद्धींगत करण्यासाठी आणि गावपातळीपर्यंत ग्रंथालय पोचविण्यासाठी नवीन ग्रंथालयाचे अर्ज स्वीकारण्यास मंजुरी देण्यात आली असून, लवकरच त्यासाठी अर्ज स्वीकारण्यास सुरवात करण्यात येईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय पुणे यांच्या वतीने पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात आयोजित पुणे जिल्हा ग्रंथोत्सव-२०२२ च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे होते. जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रेया गोखले, महापालिका उपायुक्त राजेंद्र मुठे, जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाहक सोपान पवार, उद्यम बँकेचे संचालक संदीप खर्डेकर आदी या वेळी उपस्थित होते.पाटील म्हणाले, नागरिकांपर्यंत चांगली पुस्तके पोचविल्यास ते वाचनाकडे वळतील. त्यामुळेच गाव तेथे ग्रंथालय सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रंथालयाच्या आवारात प्रदर्शनासाठी परवानगीची गरज नाही, असा निर्णयही घेण्यात आला आहे. ही प्रकिया गतिमान होण्यासाठी वाचकांपर्यंत पुस्तके पोचविण्याचे उपक्रम ग्रंथालयांनी राबवावेत.

# पुण्यात लवकरच सुरू होणार महाराष्ट्र पोलीस स्पोर्ट अकादमी

**घोरपडी । महाईन्यूज ।**



पोलीस दलातील खेळाडूंना प्रोत्साहन व प्रशिक्षण देण्यासाठी पुढच्या वर्षी पुण्यात महाराष्ट्र पोलीस स्पोर्ट अकादमीचे काम सुरू होईल, त्यासंदर्भात प्रस्तावाचे लवकरच काम सुरू होईल अशी माहिती पोलीस महासंचालक रजनीश शेठ यांनी ७१ व्या अखिल भारतीय पोलीस रेसलिंग क्लस्टर स्पर्धेलाच्या उद्घाटन प्रसंगी दिली.

वानवडीमधील राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर आजपासून या स्पर्धेला सुरुवात झाली. यावेळी पुणे पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता,अप्पर पोलीस महासंचालक चिरंजीव प्रसाद, अप्पर पोलीस महासंचालक सीआयडी रितेश कुमार, सुनील रामानंद एस जयकुमार अनुप कुमार अभिषेक त्रिमुखे दीपक साकुरे प्रवीण पाटील नम्रता पाटील तसेच पोलीस दलातील महानिरीक्षक उपमा निरीक्षक व सर्व गटाचे समादेशक व इतर अधिकारी उपस्थित होते.

१६ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत या स्पर्धा होणार असून या स्पर्धेमध्ये कुस्ती, कबड्डी, मुष्ठी युद्ध, पंजा कुस्ती, पॉवरलिफ्टींग, भारतोलन, शरीरसौष्ठव अशा विविध सात क्रीडा प्रकारांचा समावेश असेल. या स्पर्धा महिला व पुरुष या दोन्ही गटासाठी असून यामध्ये २७ राज्ये ,

---

# यूपी तुपाशी; महाराष्ट्र उपाशी!

## महाराष्ट्राला अवघा वीस लाख टनांचा कोटा मिळाल्याने प्रत्येक कारखान्यास अवघा दीड ते अडीच लाख टनांचा मिळाला कोटा

**सोमेश्वरनगर । महाईन्यूज ।**

**आंतरराष्ट्रीय बाजारात साखर तेजीत आली असून, ५५३ डॉलर प्रतिटनावर दर पोचले आहेत. त्यामुळे साखर निर्यातीला कारखान्यांना ३६५० ते ३८०० रुपये प्रतिक्विंटलने करार करता येणार आहेत. मात्र, केंद्र सरकारने निर्यातीला कोटापद्धत लागू केल्याने महाराष्ट्राच्या निर्यातीला लगाम बसला असून, उत्तर प्रदेशाची मात्र पाची बोटे तुपात बुडाली आहेत.**

कारण, खुल्या निर्यातीच्या आशेने राज्यातील कारखान्यांनी निम्मे करार केले होते. त्यामुळे निर्यात दर वाढले, पण कोटा पुरेसा नाही, अशी स्थिती झाली आहे. केंद्र सरकारने साठ लाख टन साखर निर्यातीचा निर्णय घेताना निर्यात खुली न ठेवता कारखानानिहाय कोटा ठरवून दिला. त्यामुळे मागील वर्षी ७५ लाख टनांची निर्यात करणाऱ्या महाराष्ट्राला २० लाखांचा; तर सहा लाख टन निर्यात करणाऱ्या उत्तर प्रदेशाला २१ लाख टनांचा कोटा मिळाला. महाराष्ट्रातील बहुतांश कारखान्यांनी हंगाम सुरू होताना एक-दोन लाख टनांचे ३४०० ते ३५०० रुपये प्रतिक्विंटलने निर्यात करार केले. आता महाराष्ट्राला अवघा वीस लाख टनांचा कोटा मिळाल्याने प्रत्येक कारखान्यास अवघा दीड ते अडीच लाख टनांचा कोटा मिळाला आहे.साखरेचे जागतिक दर पंधराच दिवसात ५०९ हून ५५३ डॉलर प्रतिटनांवर जाऊन पोचले आहेत. रुपयाचे मूल्य ८२ रुपयांपर्यंत घसरले आहे. परिणामी आता ३६५० ते ३८०० रुपयांपर्यंत निर्यातकरार होणार आहेत. परंतु, कोटाच पुरेसा उपलब्ध नसल्याने कारखाने नाराज आहेत. मागील वर्षी एकेका कारखान्याने चार ते दहा लाख टनांपर्यंतची निर्यात केली होती.



### कारखान्यांच्या एकीची गरज

**बंदरांअभावी उत्तरप्रदेश निर्यात करू शकत नसल्याने केंद्र सरकारने त्यांच्यावर कोटा 'स्वॅप' करण्याची मेहेरबानी केली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील कारखान्याने निर्यात कोटा खरेदी करायचा व त्याबदल्यात तेवढाच कोटा यूपीच्या कारखान्याला स्थानिक बाजारासाठी बहाल करायचा आहे. राज्यातील एका खासगी साखर उद्योगाने 'स्वॅप'चे त्रांगडे गळ्यात अडकवून घ्यायचा प्रारंभ केला. बदल्यात यूपीच्या कारखान्यास कमिशन मिळणार आहे. वास्तविक ३१ मेअखेर साखर निर्यात न केल्यास स्थानिक विक्रीचा कोटा ३० टक्क्यांनी घटविला जाणार आहे. त्यामुळे राज्यातील कारखान्यांनी एकी दाखविली; तर यूपीला कमिशन न घेता कोटा विकण्याशिवाय पर्याय उरणार नाही.**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट निवडणुकीची जोरदार तयारी

# भाजपाकडून ‘सिनेट’ निवडणुकीची जोरदार तयारी!

## आमदार महेश लांडगे : पिंपरी-चिंचवडमधील मतदान निर्णायक राहील

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि शैक्षणिक राजधानी असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ‘सिनेट’ निवडणुकीत पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील मतदार विद्यापीठ विकास पॅनेलच्या सर्व उमेदवारांच्या पाठिशी ठामपणे उभे राहतील. त्यामुळे या निवडणुकीत पिंपरी-चिंचवडकर मतदार निर्णायक ठरतील, असा विश्वास भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभेच्या पदवीधर निवडणूकांची रणधुमाळी सध्या सुरू आहे. या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवडच्या वतीने शहराध्यक्ष तथा आमदार महेशदादा लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली ‘पुणे विद्यापीठ सिनेट’ निवडणुकीत ’विद्यापीठ विकास मंच’ पॅनलचे सर्व उमेदवार बहुमताने निवडूण यावे. या करिता भाजपा शहर कार्यालयात पक्षाचे सर्व माजी नगरसेवक, नगरसेविका व सर्व मंडल अध्यक्ष यांच्या बैठकीचे आयोजन केले होते.

यावेळी पुणे विद्यापीठ विकास मंच सिनेट निवडणूकीचे समन्वयक राजेश पांडे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, उषा उर्फ माई ढोरे, सिनेट उमेदवार प्रसेनजीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर, संतोष ढोरे, राहुल पाखरे, दक्षिण भारतीय आघाडीचे प्रदेश संयोजक राजेश पिल्ले, प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, पिं.चि.नवनगर विकास प्राधीकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, राजू दुर्गे, भाजयुमोचे शहराध्यक्ष संकेत चौंधे, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा उज्ज्वला गावडे आदी उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, विद्यापीठ विकास मंच पॅनेलचे सर्व उमेदवार उच्चशिक्षित आणि त्या-त्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या मतदारांनी प्रथम पसंतीचे मत संतोष ढोरे यांना आणि पुणे परिसरातील मतदारांनी प्रथम पसंतीचे मत प्रसेनजीत फडणवीस यांना द्यावे. यासह विद्यापीठ विकास पॅनेलच्या सर्वच उमेदवारांना निवडून आणण्यासाठी भाजपाचे माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी संकल्प केला आहे.

**उमेदवार संतोष ढोरे म्हणाले की, गेल्या १० वर्षांपासून सिनेट सदस्य म्हणून काम करीत आहे. विद्यार्थी आणि विद्यापीठ विकासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न मार्गी लावण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या हक्काचा प्रतिनिधी म्हणून काम करीत आहे. विद्यार्थ्यांची शुल्कमाफी, ऑनलाईन परीक्षा न देता आलेल्या विद्यार्थ्यांना पुन: परीक्षेची संधी, नवीन वसतीगृहाची मंजुरी, शिका व कमवा योजनेतील विद्यार्थ्यांना मानधनवाढ, विद्यापीठ आवारात २७ एकर जागेत क्रिडांगण विकसित करणे आदी विविध विधायक मुद्यांवर पाठपुरावा केला आहे. त्यामुळे मतदारांनी पुन्हा काम करण्याची संधी द्यावी.**

**- संतोष ढोरे, उमेदवार, विद्यापीठ विकास पॅनेल.**

**अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून महाविद्यालयीन जीवनापासून विद्यार्थ्यांसाठी काम करीत आहे. विद्यार्थी परिषदेच्या विविध आंदोलनामध्ये सहभाग घेतला आहे. २०१७ मध्ये पदवीधर गटातून ‘सिनेट’वर निवडून दिले व ‘सिनेट’मधून मॅनेजमेंट कौन्सिलवर बिनविरोध संधी मिळाली. त्यानंतर विद्यापीठाच्या विविध समित्यांवर काम केले आहे. या निवडणुकीत पुन्हा एकदा मतदारांनी शिक्षण क्षेत्र आणि विद्यार्थी हितासाठी विद्यापीठ विकास पॅनेलच्या सर्व उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन करतो.**

**- प्रसेनजीत फडणवीस, उमेदवार, विद्यापीठ विकास मंच.**

## माजी नगरसेविका आरती चोंधे यांच्या पाठपुराव्याला यश

# रक्षक चौकात फडकणार १०० फुटी उंच तिरंगा

## भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे यांची माहिती

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपळे निलख येथील रक्षक चौकात बीआरटीएस रस्त्यालगत मिलीटरी हद्दीत १०० फूट उंच भारतीय ध्वज तिरंगा फडकण्यास केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाकडून परवानगी मिळाली आहे. तसे पत्र महापालिका प्रशासनाला प्राप्त झाले आहे. याकामी माजी नगरसेविका आरती चोंधे यांनी पाठपुरावा केला आहे, अशी माहिती भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे यांनी दिली.**

संकेत चोंधे म्हणाले की, औंध मिलिटरी कॅम्प येथील भारतीय लष्करातील जवान आणि स्थानिक नागरिकांकडून गेल्या अनेक दिवसांपासून रक्षक चौक येथे तिरंगा उभारावा, अशी मागणी होत होती. त्यानुसार माजी नगरसेविका आरती चोंधे यांच्या वतीने महापालिका प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार महापालिका प्रशासनाच्या वतीने मिलीटरी हेड क्वार्टर ३३० इनफॅन्ट्री ब्रिगडचे कर्नल लेफ्टनंट यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक भूमिका घेतली. सदर प्रस्तावाबाबत विचार होऊन त्यास मान्यता मिळवून केंद्रीय गृहमंत्रालयाचे सेक्रेटरी प्रेम प्रकाश यांनी महापालिका आयुक्तांना याबाबत पत्राद्वारे रक्षक चौकामध्ये शंभर फुटी भारतीय ध्वज कायमस्वरुपी फडकविण्यास परवागनी दिली आहे.





प्रभाग क्रमांक २६ पिंपळे निलख येथील रक्षक चौकात ‘बीआरटीएस’ रस्त्यालगत मिलिटरी हद्दीत भारताचा राष्ट्रध्वज उभारणे तसेच इतर स्थापत्य अनुषंगिक कामे करणे आदी कामांचा अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला आहे. या कामास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. तसेच अंदाजपत्रकात तरतूद करून कामाचे आदेशही देण्यात आले आहेत.

### देशभक्ती अन् समर्पण भावनेचे प्रतिक...

**भारतीय ध्वज हा देशभक्ती आणि समर्पण भावनेचे प्रतिक आहे. रक्षक चौकात तिरंगा उभारण्यास मंजुरी मिळाल्यामुळे औंध मिलिटरी कॅम्प येथील भारतीय सैन्य आणि स्थानिक नागरिकांत समाधान व्यक्त केले जात आहे. ध्वज उभारण्याचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी प्रशासनाला केली आहे, असेही संकेत चोंधे यांनी सांगितले.**

## संपादकीय »

# माणुसकीच्या खांडोळ्या

***राजधानी दिल्लीत उघडकीस आलेल्या अमानुष हत्येच्या प्रकरणाने कुठल्याही सामान्य नागरिकाच्या अंगावर शहारे आल्याशिवाय राहणार नाहीत. २***

२८ वर्षे वयाच्या तरुणाने आपल्या मैत्रिणीची गळा दाबून हत्या करुन तिच्या देहाचे पस्तीस तुकडे करुन ते फ्रिजमध्ये ठेवले आणि एकेक करुन शांतपणे नष्ट करण्याचा खटाटोप केला. ही हत्या मे महिन्यातच झाली होती आणि मैत्रिणीच्या मृतदेहाचे खंडशी त्याने प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये भरुन बरेच दिवस जपून ठेवले. त्यातले काही चक्क कुत्र्यांना खायला घातले. त्याच फ्रिजमध्ये तो आपले एरवीचे खाद्यपदार्थही ठेवत होता. बेपत्ता तरुणीचा तपास करणारे पोलिस त्याच्या घरापर्यंत पोचल्यावर मात्र त्याने थंडपणे आपल्या अमानुष कृत्याचा तपशील उघड केला. माणूस इतक्या नराधम पातळीपर्यंत कसा पोचतो? कुठल्या संप्रेरकांचे अतिरिकी उत्तेजन किंवा अभाव त्याला या नीचतम पातळीला नेते? माणसाच्या मेंदूतच काही गंभीर बिघाड सुप्तावस्थेत असतो आणि प्रसंगापरत्वे ती विकृती पृष्ठभागावर तरंगू लागते? नात्यागोत्यांचे बंध इतक्या टोकाला जाण्याची कारणे काय? जगण्यातले ताणतणाव, स्वातंत्र्याबद्दलच्या भलभलत्या कल्पना, समाजमाध्यमांचा कल्लोळ यामुळे आपल्या भाव-भावनांचेच बकालीकरण होत आहे का? असे अनेक प्रश्न यातून निर्माण होतात. पण हे बहुतेक प्रश्न मानसशास्त्राच्या पातळीवरचे आहेत. तूर्त पोलिसांचा तपास वेगळ्याच धाग्यांच्या शोधात आहे. उदाहरणार्थ, या हत्या-प्रकरणात अंमली पदार्थांचा सहभाग आहे का? 'कॅनिबलिझम' म्हणजेच नरमांसभक्षणाचा हिंस्त्र पैलू यात असावा का? सुमारे २७ वर्षांपूर्वी तंदूर हत्याकांडाने दिल्ली शहर हादरले होते. नैना साहनीच्या मृतदेहाचे तुकडे करुन तिच्या पतीने हॉटेलातील तंदूरभट्टीत ते नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. जाहिरात क्षेत्रातील व्यावसायिक नीरज ग्रोव्हर याची हत्या करुन मृतदेहाचे तुकडे करुन विल्हेवाट लावल्याच्या आरोपाखाली प्रसिद्ध मॉडेल मारिया सुसाईराजला अटक झाली होती. कुख्यात गुंड विलास पालांडेने २०१२ मध्ये सिनेदिग्दर्शक करण कक्करची अशीच देहाची खांडोळी करुन हत्या केली होती. २०१९ मध्ये मुंबईत बेनेट रिबेलो या संगीतकारास त्याच्या दत्तक मुलीने, आपल्या बॉयफ्रेंडच्या मदतीने संपवून त्याच्या मृतदेहाचे तुकडे माहीमच्या समुद्रात फेकले होते. गेल्या ऑगस्ट महिन्यात पुण्याजवळ थेऊरजवळ एका वृद्धेचे तुकडे करुन हत्या केल्याच्या आरोपाखाली मुलगा आणि नातवाला अटक झाली होती. गेल्याच आठवड्यात चंद्रपूरनजीक दुर्गापूर येथे एका गुंडाला विरोधी टोळीतील काही गुंडांनी भर रस्त्यात खतम केले होते.

# पाकिस्तानी पत्रकार दहशतीत




अर्शद शरीफ हा पाकिस्तानी पत्रकार होता. त्याला ठार मारण्यात आले, ते पाकिस्तानात नव्हे तर केनियात. पाकिस्तानी पत्रकारांसाठी इतर राष्ट्रेही सुरक्षित नाहीत, अशी चर्चा पाकिस्तानात सुरू झाली आहे. अर्शद हा पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाचे प्रमुख इम्रान खान यांचा समर्थक होता. एकेकाळी त्याचे लष्कराशी असलेले चांगले संबंध बिघडले आणि तो लष्करावर टीका करत होता.

पाकिस्तानात लष्कर, आयएसआय किंवा अन्य सरकारी संस्थांवर टीका करणे सोपे नाही. सत्तेत लष्कराची महत्त्वाची भूमिका असल्याने टीकाकारांवर कारवाई केली जाते. पत्रकारांना तर याबाबत अधिकच काळजी घ्यावी लागते. लष्कर किंवा आयएसआयवर टीका करण्यापूर्वी बराच विचार करावा लागतो. तिथल्या पत्रकारांना लष्कर आणि दहशतवाद्यांची सतत भीती असते. तरीही अनेक पत्रकार या दोन्ही शक्तींच्या विरोधात लिहिता-बोलताना आढळतात. गेल्या वर्षी चार, तर यावर्षी आतापर्यंत पाच पत्रकारांची पाकिस्तानात हत्या झाली आहे. पत्रकारांसाठी पाकिस्तान नेहमीच धोकादायक ठरला आहे. गेल्या वर्षी अफगाणिस्तानात नऊ, मेक्सिकोत आठ आणि भारतात चार पत्रकारांची हत्या झाली. जगभरात गेल्या वर्षी ४५ पत्रकारांची हत्या झाली आहे. एआरवाय या वृत्तवाहिनीत अर्शद काम करत होता. ४९ वर्षांचा अर्शद काही काळापासून इम्रान खान यांच्या जवळ आणि त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा समर्थक होता. एप्रिलमध्ये इम्रान खान यांची सत्ता गेली. खान यांच्या पीटीआय पक्षाच्या काही खासदारांनी बंड केल्याने विरोधी पक्षांनी मांडलेला अविश्वास प्रस्ताव मंजूर होऊन पाकिस्तान मुस्लिम लीगचे (एन) शाहबाज शरीफ इतर पक्षांच्या मदतीने पंतप्रधान झाले. २०१८ च्या निवडणुकीत इम्रान खान यांच्या पक्षाचा विजय झाला होता आणि त्यात लष्कराची महत्त्वाची भूमिका होती. आता परिस्थिती बदलली.



सत्ता जाण्यापूर्वी खान यांनी लष्करप्रमुख जनरल कमर बाजवा यांना 'आम्ही तुम्हाला मुदतवाढ देऊ' असे सांगूनही पाहिले, पण त्याचा उपयोग झाला नाही. आपण तटस्थ आहोत, असे लष्कर म्हणत असले, तरी त्याने प्रत्यक्ष शरीफ यांना मदत केली. लष्कराच्या या भूमिकेला अर्शदचा विरोध होता आणि त्याबद्दल तो उघडपणे बोलत होता. शाहबाज सरकार आणि लष्कराला अर्शदची ही भूमिका मान्य नव्हती.

अर्शद यांनी खान यांचे सहकारी शाहबाज गिल यांची घेतलेली मुलाखत वादळी ठरली. त्यानंतर अर्शद आणि गिल यांच्या विरोधात पोलिसांनी देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला. अर्शदवर लष्करात बंड करण्याची चिथावणी आणि सरकारी संस्थांवर टीका केल्याचा, तर गिल यांच्या विरोधात राष्ट्रविरोधी वक्तव्याचा आरोप करण्यात आला. सुरुवातीला वृत्तवाहिनीने अर्शदला मदत करण्याची भूमिका घेतली. परंतु 'पाकिस्तान इलेक्ट्रॉनिक मीडिया रेग्युलेटरी ॲथॉरिटी'ने (पेमरा) प्रसारण बंद केल्यानंतर एआरवायनी अर्शदशी संबंध तोडले. त्याला कामावरून काढून टाकण्यात आलं. पेमराने घेतलेल्या निर्णयाची परिणती अर्शदच्या हकालपट्टीत झाली. अर्शदला अनेक पत्रकारांनी आणि पीटीआयने देखील पाठिंबा दिला. मात्र, आता आपल्याला अटक होणार आणि आपला छळ होणार, असे अर्शदला वाटू लागले आणि त्याने देश सोडण्याचा निर्णय घेतला. ऑगस्टमध्ये त्याने दुबईत आश्रय घेतला. परंतु दुबईत पाकिस्तानी यंत्रणा आणि अन्य अधिकाऱ्यांकडून त्याला त्रास सुरू झाला. मग अन्य एक-दोन राष्ट्रांमार्गे शेवटी त्याने केनिया गाठले. राजधानी नैरोबीबाहेर एका कामासाठी गेलेला अर्शद परत येत असताना २३ ऑक्टोबर रोजी त्याच्या गाडीवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात अर्शदचा मृत्यू झाला आणि पाकिस्तानी ड्रायव्हर खुर्रम अहमद जखमी झाला. पोलिस वाहनचोरी करणाऱ्या टोळीला शोधत असताना चुकून हा गोळीबार झाला, असे प्रारंभी केनियाच्या पोलिसांनी सांगितले.

# मानसिक आरोग्याचा विमा अपुराच!

**अनेकदा शारीरिक आजारांवरील उपचारांच्या विम्याची रक्कम मिळवताना एवढा खटाटोप करावा लागतो, की मानसिक आजारांनाही विमा संरक्षण मिळू शकते, हेच कल्पनेच्या पलीकडचे वाटते.**

मानसिक आजारांना खासगी कंपन्या आणि सरकारच्या पातळीवरही विमा संरक्षण दिले जाऊ लागले आहे, मात्र ते खरोखरच प्रभावी आहे का, अशा स्वरूपाचा विमा उतरवताना संबंधित योजना कोणत्या निकषांवर पडताळून पाहणे गरजेचे आहे, हे माहीत असणे महत्त्वाचे ठरते.


एरवी नेहमीच दुर्लक्षित राहिलेले मानसिक आरोग्याचे महत्त्व कोविडकाळात अधोरेखित झाले. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, करोना साथीच्या पहिल्या वर्षात, नैराश्य आणि चिंता या मानसिक आजारांचे प्रमाण २५ टक्क्यांहून अधिक वाढले. याघडीला जगात मानसिक आजारांचे एक अब्ज रुग्ण आहेत. त्यातील ७० टक्क्यांहून अधिक रुग्णांना आवश्यक ती मानसिक आरोग्यसेवा आणि मदत मिळत नाही. भारताच्या बाबतीत सांगायचे झाले तर, 'इंडियन सायकियाट्री सोसायटी'च्या २०२० मधील सर्वेक्षणानुसार सामान्यपणे ४० टक्क्यांहून अधिक भारतीय मानसिक आजाराला बळी पडतात. कोविड साथीनंतर हे प्रमाण आणखी वाढले आहे.



मानसिक आजारांवरील उपचार अधिक खर्चीक आहेत. आधीच कोमात असलेल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत मोफत आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्यसेवा मिळणे हे सध्या तरी स्वप्नवत वाटावे एवढे कठीण आहे. नाइलाजाने रुग्णांना खासगी दवाखान्यांत जावे लागते. खासगी दवाखान्यांत मानसिक आजारांवर उपचार घेताना एका सत्रासाठी साधारण ८०० ते पाच हजार रुपये खर्च येतो. रुग्णास त्याच्या आजाराच्या तीव्रतेनुसार कमीतकमी सहा ते जास्तीत जास्त २० सत्रे उपचार घ्यावेच लागतात. याव्यतिरिक्त औषधे, तपासण्या इत्यादींसाठी वेगळा खर्च करावा लागतो. गेल्या १५ वर्षांत खासगी कंपन्यांनी आरोग्य विमा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली असली, तरी मानसिक आरोग्य क्षेत्रासाठीची गुंतवणूक अत्यंत नगण्य आहे. २०१७ साली संमत झालेल्या 'मानसिक आरोग्यसेवा कायद्या'त विमा योजनेचा प्रथमच उल्लेख करण्यात आला. 'प्रत्येक विमा कंपनीने शारीरिक आजारांच्या उपचार-विम्यासारखीच मानसिक आजारांच्या उपचारांसाठी वैद्यकीय विमा योजना आणि त्यासाठीची तरतूद केली पाहिजे' असे कायद्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

२०१८ आणि २०२० मध्ये 'विमा नियामक आणि विकास प्राधिकरणा'ने (आयडीआरएआय) सर्व विमा कंपन्यांना या नियमाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते. विमा कंपन्या मानसिक आजार विमा संरक्षणअंतर्गत साधारण ३०० योजना जाहीर केल्याचा दावा करत आहेत. पण प्रत्यक्षात तसे दिसत नाही. हातावर मोजण्याइतक्याच खासगी विमा कंपन्यांनी मानसिक आरोग्य विमा संरक्षण योजना जाहीर केल्या आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### अलिबाग: मीनल दळवी यांना जामीन मंजूर

। अलिबाग । महाईन्यूज ।

लाचखोरीच्या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या अलिबागच्या तहसीलदार मीनाल दळवी यांना विशेष न्यायालयाने आज जामीन मंजूर केला.गेली दोन दिवस मीनल दळवी या न्यायालयीन कोठडीत होत्या. त्यांनी जामीन मिळावा यासाठी अलिबागच्या विशेष सत्र न्यायाधीश अशोक कुमार भिलारे यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला होता. यावर बुधवारी सकाळी सुनावणी झाली.

दोन्ही बाजूचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. पंचवीस हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर त्यांची सुटका करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. दर सोमवारी त्यांना पोलीस ठाण्यात हजेरी लावावी लागणार आहे.

# “श्रद्धाचा खून विकृतीच्या पुढचं पाऊल”!

## संजय राऊतांचं विधान !आरोपीला भरचौकात फाशी देण्याची मागणी

। मुंबई। महाईन्यूज ।

**वसईच्या श्रद्धा वालकर खून प्रकरणाने देशात खळबळ माजली आहे. या प्रकरणात रोज नवनवे धक्कादायक खुलासे होत आहेत. खासदार संजय राऊत यांनी या खून प्रकरणातील मारेकऱ्याला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. “मारेकऱ्यावर खटले चालवू नका. परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे त्याला भरचौकात फासावर लटकवा” असे राऊत यांनी म्हटले आहे.**



देशभरातील मुलींनी सावधपणे जगण्यास शिकलं पाहिजे, असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

“महाराष्ट्रातील मुलीची हत्या धक्कादायक आणि दुर्दैवी आहे. समाजमाध्यमातून ओळखी होतात, त्यातून अशी भयंकर नाती निर्माण होतात. ही मुलं कोणत्या धुंदीत आणि गुंगीत जगत आहेत, हे आज परत एकदा कळलं आहे”, असे राऊत म्हणाले आहेत. “श्रद्धाचा खून विकृतीच्या पुढचं पाऊल आहे.

या खून प्रकरणात राजकारण बंद केलं पाहिजे. यात राजकारण करणारे समाजाचे शत्रू आहेत”, अशी टीका त्यांनी केली आहे. पीडित मुलीच्या वडिलांचा, कुटुंबाचा आक्रोश समजून घेतला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

२६ वर्षीय श्रद्धाचा तिचा प्रियकर आफताब अमीन पूनावाला (२८) याने गळा आवळून खून केला. त्यानंतर तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मृतदेहाचे तब्बल ३५ तुकडे केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात आरोपी आफताबला पोलिसांनी अटक केली आहे. ‘डेक्सटर’ नावाची वेब सीरिज पाहिल्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्याची कल्पना सुचल्याचे आरोपीने पोलीस तपासात सांगितले आहे.

दिल्लीतील हे खून प्रकरण पाच महिन्यांनंतर जगासमोर आले आहे. श्रद्धाच्या मृतदेहाचे तुकडे फ्रिजमध्ये ठेऊन तब्बल तीन आठवडे तो टप्प्याटप्प्याने त्याची विल्हेवाट लावत होता.

अवयवांचे तुकडे मेहरोलीच्या जंगलात फेकल्याचे तपासात उघड झाल्यानंतर याठिकाणी पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

---

## “दरवाढीच्या वाहत्या गंगेत साठेबाज, व्यापारी, कॉर्पोरेट कंपन्या...”

### महागाईच्या मुद्द्यावरुन शिवसेनेचा मोदी सरकारवर हल्लाबोल



।मुंबई। महाईन्यूज ।

पशुखाद्यासाठी वापरली जाणारी ज्वारी खाण्याची वेळ ग्रामीण जनतेवर आली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे फळ हेच म्हणायचे का? असा थेट सवाल शिवसेनेनं केंद्र सरकारला विचारला आहे. माहागाईच्या मुद्द्यावरुन केंद्र सरकार खोटी आकडेवारी दाखवून लोकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे संपादक असलेल्या ‘सामना’मधून करण्यात आला आहे.

“आपल्या देशात जनता सतत वाढणाऱ्या महागाईने त्रस्त झाली आहे. अन्नधान्याच्या दरात विक्रमी दरवाढ झाल्याने खायचे काय, हा प्रश्न लोकांसमोर उभा राहिला आहे. तरीही ‘देशातील महागाई कमी झाली’ अशी एक बातमी सरकारी हवाल्याने प्रसिद्ध झाली आहे. आता सरकारीच हवाला तो! त्याचा आणि प्रत्यक्षातील वस्तुस्थितीचा कुठे संबंध असतो?” असा उपहासात्मक टोला ठाकरे गटाने लगावला आहे. “पुन्हा सरकारचे हे सगळे हवाले आकड्यांची जोडतोड करून तयार केलेले असतात.

त्यामुळे ‘कागदोपत्री’ फुंकर यापलीकडे त्याला काहीच अर्थ नसतो. सरकार मात्र स्वतःच स्वतःची पाठ थोपटून घेत असते. आताही महागाई काही प्रमाणात कमी झाली, या सरकारी दाव्याबाबत यापेक्षा वेगळे घडलेले नाही. केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने सोमवारी जी माहिती प्रसिद्ध केली.

# विनायक मेटे मृत्यूप्रकरणी सीआयडीच्या हाती सबळ पुरावे

## चालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवला

। नाशिक । महाईन्यूज ।

शिवसंग्रामचे प्रमुख विनायक मेटे यांच्या मृत्यूप्रकरणात सीआयडीच्या हाती सबळ पुरावे आले आहेत. त्यानंतर सीआयडीने विनायक मेटे यांचा वाहन चालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवला आहे. रसायनी पोलीस स्टेशनमध्ये कलम ३०४ (२) नुसार या गुन्ह्याची नोंद झाली आहे.

सीआयडीकडून या प्रकरणाचा तपास सुरू होता. तपासात विनायक मेटेंची गाडी ज्या मार्गाने गेली त्या मार्गावरील सीसीटीव्ही तपासण्यात आले. याशिवाय तज्ज्ञांची एक समिती तयार करून त्यांच्याकडूनही याप्रकरणी मतं घेतली गेली. या समितीत आयआरबीचे अभियंता आणि इतरांचा समावेश होता. सीआयडीने केलेल्या सीसीटीव्ही तपासणीत विनायक मेटेंच्या चालकाने तासी



१३०-१४० किलोमीटर वेगाने गाडी चालवल्याचं समोर आलं आहे. याशिवाय गाडीचा अपघात होण्याआधी चालक एकनाथ कदमने दुसरी गाडी ओव्हरटेक करत असतानाही आपली गाडी ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केल्याचं समोर आलं. जागा नसतानाही ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नातच हा अपघात झाला, असंही या तपासात समोर आलं आहे.

या प्रकरणात रसायनी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केल्यानंतर लवकरच सीआयडी आरोपी चालक एकनाथ कदमला अटक करण्याची शक्यता आहे.

नेमकं झालं काय होतं?

मराठा आरक्षणासाठी १४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलावलेल्या बैठकीसाठी विनायक मेटे बीडहून मुंबईच्या दिशेने येत होते. रविवारी पहाटे ५ च्या सुमारास महामार्गावरील माडप बोगद्याजवळ त्यांच्या कारला भीषण अपघात झाला. विनायक मेटे यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर मृत घोषित करण्यात आलं.

# आरबीआयच्या शिफारशीनंतरच; नोटबंदीवरून मोदी सरकारचे कोर्टात स्पष्टीकरण!

## काळा पैसा हा करचुकवेगिरीचा सामना करण्यासाठी एक प्रभावी उपाय

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बनावट नोटा, टेरर फंडिंग रोखण्यासाठी हा प्रभावी उपाय असल्याचे सांगत केंद्राने २०१६ च्या नोटाबंदी प्रकरणी सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. काळा पैसा हा करचुकवेगिरीचा सामना करण्यासाठी एक प्रभावी उपाय आहे. मात्र हा केवळ सरकारचा निर्णय नव्हता, असं म्हणत मोदी सरकारने नोटाबंदीच्या निर्णयावर रिझर्व बँकेकडे बोट दाखवत आपला बचाव केला आहे.केंद्र सरकारने म्हटलं की, नोटबंदी आरबीआयच्या केंद्रीय मंडळाच्या केंद्र सरकारला दिलेल्या विशिष्ट शिफारशीनुसार केली गेली. आरबीआयने या शिफारशीच्या अंमलबजावणीसाठी मसुदा आराखडाही प्रस्तावित केला होता.**



**काळा पैसा हा करचुकवेगिरीचा सामना करण्यासाठी एक प्रभावी उपाय आहे. मात्र हा केवळ सरकारचा निर्णय नव्हता, असं म्हणत मोदी सरकारने नोटाबंदीच्या निर्णयावर रिझर्व बँकेकडे बोट दाखवत आपला बचाव केला आहे.केंद्र सरकारने म्हटलं की, नोटबंदी आरबीआयच्या केंद्रीय मंडळाच्या केंद्र सरकारला दिलेल्या विशिष्ट शिफारशीनुसार केली गेली. आरबीआयने या शिफारशीच्या अंमलबजावणीसाठी मसुदा आराखडाही प्रस्तावित केला होता.**

बनावट नोटा, टेरर फंडिंग, काळा पैसा आणि करचुकवेगिरीला आळा घालण्यासाठी नोटाबंदी हा एक प्रभावी उपाय आणि एक प्रमुख धोरण असल्याचे केंद्राने म्हटले आहे. संसदेच्या अधिनियमाने (आरबीआय कायदा १९३४) कायद्यातील तरतुदींनुसार दिलेल्या अधिकारांनुसार नोटाबंदीचा प्रयोग करण्यात आल्याचे केंद्राने म्हटले आहे.

गेल्या सुनावणीत केंद्र आणि आरबीआयच्या वतीने प्रतिज्ञापत्र दाखल न केल्याबद्दल घटनापीठाने नाराजी व्यक्त केली होती. नोटाबंदीसंदर्भात दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांवर सुप्रीम कोर्टाच्या घटनात्मक पीठाने सुनावणी सुरू केली आहे.

2016 मध्ये केलेल्या 500 आणि 1000 रुपयांच्या नोटबंदीच्या निर्णयाविरोधात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या होत्या.

गेल्या सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने नोटाबंदीच्या निर्णयावर केंद्र आणि आरबीआयकडून उत्तर मागवलं होतं.

# महापालिका निवडणुकीत 'कॅश फॉर तिकीट'; आमदारचा पीए गजाआड

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) आज एक मोठी कारवाई करताना दिल्ली महापालिका (एमसीडी) निवडणुकीत आम आदमी पक्षाचे तिकिट मिळवून देण्यासाठी लाच घेतल्याच्या आरोपाखाली मॉडेल टाऊनचे आमदार अखिलेशपती त्रिपाठी यांचा स्वीय सहाय्यक व त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना अटक केली आहे. एमसीडी निवडणुकीत कॅश फॉर तिकिटचा असा खुल्लमखुल्ला खेळ रंगण्याची ही पहिली वेळ मानली जात आहे. या तिघांनी तिकिटासाठी गोपाल खारी या आप कार्यकर्त्याकडूनच लाच घेतल्याचा आरोप आहे. निवडणुकीच्या एन रणधुमाळीत या कारवाईमुळे दिल्ली महापालिका निवडणुकीपूर्वीच आम आदमी पक्षाला एक मोठा झटका बसला आहे.

आमदार त्रिपाठी यांचे पीए ओम सिंग आणि त्याचे साथीदार शंकर पांडे व राजकुमार रघुवंशी यांना अटक करण्यात आली आहे. आपण गेल्या निवडणुकीतही कमलानगर वॉर्ड-६९ मधून तिकिट मिळवण्याचा प्रयत्न केला, पण ते मिळाले नाही, असा आरोप खारी यांनी केला आहे. ते म्हणाले की “मी २०१४ पासून आम आदमी पक्षाचा सक्रिय सदस्य आहे. यावेळी कमला नगरची जागा महिलांसाठी राखीव झाल्याने मी माझी पत्नी शोभा यांच्यासाठी आपचे तिकिट मागत होतो. त्रिपाठी यांच्यावतीने मला सांगण्यात आले की तिकिट मिळेल पण ९० लाख रुपये द्यावे लागतील. त्रिपाठी यांनी तिकिटासाठी ९० लाख रुपयांची मागणी केली होती, त्यापैकी ३५ लाख रुपये त्यांनी अखिलेश यांचे पती त्रिपाठी यांना आणि २० लाख रुपये वजीरपूरचे आमदार राजेश गुप्ता यांना त्रिपाठी यांच्या सांगण्यावरून दिले असे त्यांनी पोलिसांना सांगितले.

# शिंदे गटाला केंद्रात दोन मंत्रिपदं मिळणार?

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

राज्यात भाजपसोबत सरकार स्थापन करणाऱ्या एकनाथ शिंदे गटाला केंद्रात दोन मंत्रिपदं देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. यामध्ये एक कॅबिनेट तर दुसरं राज्यमंत्रीपद असेल. गजाननं किर्तीकर आणि हेमंत पाटील या दोन खासदारांना ही मंत्रिपदं मिळतील अशी माहिती साम टिव्हीच्या सुत्रांकडून मिळाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, शिवसेनेच्या शिंदे गटाला केंद्रात दोन मंत्रिपद देण्यात येणार आहे. यामध्ये एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्रीपद देण्यात येणार आहे. हिमाचल प्रदेश आणि गुजरातच्या विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर केंद्रिय मंत्रीमंडळाचा विस्तार होणार आहे. दरम्यान, केंद्रात मंत्रिपद देताना ज्येष्ठतेनुसार दिलं जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामध्ये गजानन कीर्तिकर आणि हेमंत पाटील यांच्या नावाची चर्चा आहे. तर महिला म्हणून खासदार भावना गवळी यांचं नावही आघाडीवर आहे. त्याचबरोबर शिंदे गटात आलेल्या ज्येष्ठांना राज्यपालपदी नियुक्ती मिळावी म्हणूनही शिंदे गटाची केंद्रात लॉबिंग सुरु असल्याचं कळतंय, असंही सुत्रांनी सांगितलं आहे.



# बैलगाडा शर्यतींना पुन्हा खीळ बसणार?

## सुप्रीम कोर्टात लवकरच महत्वाची सुनावणी

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

तामिळनाडूतील 'जल्लीकट्टू' खेळ आणि महाराष्ट्रातील 'बैलगाडा शर्यती' विरोधातील याचिकांवरील सुनावणी पुढे ढकलण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. या याचिकांमध्ये तामिळनाडू आणि महाराष्ट्र सरकारच्या या खेळांशी संबंधित कायद्यांना आव्हान देण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती केएम जोसेफ यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. तामिळनाडू सरकारच्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयाला हिवाळी सुट्ट्यांच्या नंतर जल्लीकट्टू वरील सुनावणी घेण्याची विनंती केली होती. कारण या प्रकरणी संकलित अहवाल सादर करायचा आहे असे त्यांनी म्हटले होते. त्यावर न्यायमूर्ती जोसेफ यांनी वकिलांना



अहवाल लवकर सादर करण्याचे निर्देश दिले आणि सांगितले की, जल्लीकट्टू जानेवारीमध्ये आहे, त्यामुळे आम्ही याचिकेवरील सुनावणी पुढे ढकलणार नाही.

यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने जल्लीकट्टूविरोधातील याचिकांवर २३ नोव्हेंबर रोजी सुनावणी निश्चित केली होती. पाच न्यायाधीशांच्या घटनापीठात न्यायमूर्ती केएम जोसेफ, न्यायमूर्ती अजय रस्तोगी, न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस, न्यायमूर्ती हृषिकेश रॉय आणि न्यायमूर्ती सीटी रविकुमार यांचा समावेश आहे. हे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करत आहे. तमिळनाडू आणि महाराष्ट्रात परवानगी

### PETA ची कायदा रद्द करण्याची मागणी

**तामिळनाडू आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांच्या संबंधित कायद्यांना आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. पीपल फॉर द एथिकल ट्रीटमेंट ऑफ ॲनिमल्स (PETA) च्या नेतृत्वाखाली याचिकाकर्त्यांच्या गटाने तामिळनाडू विधानसभेने मंजूर केलेला जल्लीकट्टू कायदा रद्द करण्याची मागणी केली आहे. PETA ने अनेक कारणास्तव विधानसभेने पारित केलेल्या प्राण्यांसाठी क्रूरता प्रतिबंध (तामिळनाडू सुधारणा) विधेयक २०१७ ला आव्हान दिले आहे.**

फेब्रुवारी २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण घटनापीठाकडे पाठवले होते. तामिळनाडू आणि महाराष्ट्रातील लोक 'जल्लीकट्टू' आणि बैलगाडी शर्यत हा त्यांचा सांस्कृतिक हक्क म्हणून जपू शकतील का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यांना घटनेच्या कलम २९(१) अंतर्गत संरक्षण मिळू शकते का? तामिळनाडू आणि महाराष्ट्र सरकारने केंद्राने लागू केलेल्या प्राण्यांवर क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६० मध्ये सुधारणा केली आहे आणि त्यांच्या संबंधित राज्यांमध्ये अनुक्रमे जल्लीकट्टू आणि बैलगाडी शर्यतींना परवानगी दिली आहे.

राज्यातील 'जल्लीकट्टू' आणि देशभरातील बैलगाडी शर्यतींमध्ये बैलांच्या वापरावर बंदी घालण्याच्या २०१४ च्या निर्णयाचा पुनर्विचार करणारी तामिळनाडू सरकारची याचिका सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी फेटाळून लावली होती.

# शंकर-जयकिशन यांच्या गाण्यांचे सुरेल सादरीकरण



पुणे: प्रसिद्ध संगीतकार शंकर- जयकिशन यांच्या सदाबहार गाण्यांचे सुरेख सादरीकरण राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात झालेल्या एका सहज सुंदर कार्यक्रमात करण्यात आले. तुडुंब भरलेल्या सभागृहात सर्वच गाण्यांना उस्फूर्त दाद मिळाली. गाण्याचे चित्रपटातील स्थान, त्याची पार्श्वभूमी, शब्दांना देण्यात आलेले महत्त्व आणि गायकांची सुरेल जोड याचे विश्लेषण करणारा हा कार्यक्रम रसिकांना चांगलाच भावला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने तब्बल अडीच वर्षानंतर पुन्हा एकदा तुडुंब भरलेले प्रेक्षागृह आणि मनमुराद आनंद घेणारे श्रोते असे दृश्य बघायला मिळाले.

सर्वांचे लाडके संगीतकार शंकर- जयकिशन यांच्या संगीतावर आधारित "ताक धिना धीन" हा दृकश्राव्य कार्यक्रम "बीयाँड एंटरटेनमेंट" यांच्या तर्फे सादर केला गेला.

प्रसिद्ध सिने लेखिका, व्यासंगी सिने पत्रकार सुलभा तेरणीकर आणि वंदना कुलकर्णी यांनी हा कार्यक्रम सादर केला. उस्मान शेख यांनी व्हिडिओ संकलन केले. १९४९ च्या बरसात च्या संगीता पासून सुरू झालेला शंकर जयकिशन या जोडीचा हा सुरेल प्रवास, त्यांनी दिलेल्या अनेक लोकप्रिय गाण्यातून उलगडला गेला. बरसात, आवरा, श्री ४२० अशा राज कपूर यांच्या चित्रपटांबरोबरच,

पटरानी, छोटी बहन, सीमा, यहुदी, दिल तेरा दिवाना, आम्रपाली, अशा विविध गाण्यांचा खजिना प्रेक्षकांना तृप्त करून गेला. दोघींचे अतिशय सहज सुंदर आणि अभ्यासू निवेदन ही या कार्यक्रमाची मोठी जमेची बाजू होती. अडीच तास रंगलेल्या या कार्यक्रमानंतर याचे आणखी किमान दोन ते तीन भाग करण्याची मागणी एकमुखाने केली गेली. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाने दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद देत कार्यक्रमाची सांगता

# तमन्ना लवकरचं विवाह बंधनात

दाक्षिणात्य सुंदरी अभिनेत्री तमन्ना भाटिया ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. तिचा अभिनय असो किंवा ग्लॅमरस अदा तिचे चाहते नेहमीच तिच्यावर फिदा असतात. ती सर्वांचीच आवडती आहे. तमन्नाला मोठ्या पडद्यावर 17 वर्षे झाली असली तरी तिची लोकप्रियता कायम आहे.

सध्या बॉलिवूडवरच नव्हे तर टॉलिवूडवरही लग्न सराईचे वारे वाहत आहे. कियारा सिद्धार्थ, हसिंका मोटवाणी लवकरच विवाह बंधनात अडकणार आहे. आता त्याच यादीत तमन्नाताही सामावेश होणार आहे. ती लवकरच लग्न करणार असल्याची माहिती समोर आली आहे.


येत्या काही दिवसांत तमन्नाच्या लग्नाबाबत अनेक बातम्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. तिच्या लग्नाशी संबंधित अनेक बातम्या याआधीच चर्चेत आहेत. अलीकडेच सोशल मीडियावर आणखी एक बातमी व्हायरल होत आहे, मात्र यावेळी तमन्नाने तिच्या लग्नाच्या बातमीवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. तिने या बातम्यांना होकार दिला नसला तरी नाकारलेलेही नाही.

आता तमन्नाचे चित्रपटही जवळपास पूर्ण झाले आहेत. ती कोणताही नवीन प्रोजेक्ट घेत नसून ती लवकरच लग्नाच्या तयारीत व्यस्त होणार आहे. तिला स्वतःसाठी देखील थोडा वेळ हवा आहे. रिपोर्टमध्ये असा दावा केला जात आहे की, तमन्नाला एका बिझनेसमनचा प्रस्ताव आला आहे. तिने तो स्वीकारला असून लग्नासाठी होकारही दिला आहे. लग्नाबाबतची अधिकृत घोषणा लवकरच होणार असल्याचंही बोललं



# भारत-पाकिस्तान बॉर्डरवर जाऊन सोनालीची पोस्ट


अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हे मनोरंजन विश्वातील एक महत्वाचं नाव. गेली काही दिवस ती सातत्याने चर्चेत आहे. मग तिचे लग्न असो, हनीमून असो किंवा वैयक्तिक आयुष्यातील घडामोडी. ती कायमच चाहत्यांशी जोडली गेलेली असते. मध्यंतरी तिचा 'तमाशा लाईव्ह' चित्रपट येऊन गेला, तर लवकरच ती 'महाराणी ताराराणी' यांच्या चरित्रावर चित्रपट करणार आहे. आता तिने पुन्हा काही फोटो शेयर केले आहेत ज्यामध्ये ती आपल्या सासर -माहेर लोकांसोबत एकत्र दिसत आहे. विशेष म्हणजे ती कुटुंबासोबत भारत पाकिस्तान बॉर्डरवर गेली असून एका पोस्टच्या माध्यमातून तिने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सोनालीने एक स्वप्न उराशी बाळगलं होतं, ते म्हणजे तिला 'अटारी'



म्हणजे भारत पाकिस्तान सीमेवरील 'वागाह' बॉर्डर येथे जायचं होतं, अखेर तिचे ही स्वप्न पूर्ण झाले असून आपल्या कुटुंबासोबत तिने 'वागाह बॉर्डर'ला भेट दिली. तिथे घालवलेले काही रम्य क्षण तिने शेयर केले आहेत.


# 'गोष्ट एका पैठणीची'?

गेली काही दिवस सतत चर्चेत असणारा आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेता 'गोष्ट एका पैठणीची' हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. करोनामुळे लांबलेला हा चित्रपट कधी एकदा प्रदर्शित होतोय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे जाणून घेऊया हा चित्रपत्र नेमका काय आहे? त्यातील कलाकार, आशय-विषय आणि बरंच काही..



'६८ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार २०२२'चा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मानकरी ठरलेला 'गोष्ट एका पैठणीची'चे नवीन पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीस आलं आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील गृहिणीच्या सामान्य स्वप्नाचा प्रवास असणाऱ्या या चित्रपटात सायली संजीव, सुव्रत जोशी, मृणाल कुलकर्णी, मिलिंद गुणाजी, शशांक केतकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. नुकताच या चित्रपटाचा भव्य प्रीमिअर सिंगापूर येथे झाला. आता लवकरच म्हणजे २ डिसेंबर रोजी हा चित्रपट महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. पोस्टरमध्ये सायली संजीव, सुव्रत जोशी आणि आरव शेट्ये दिसत असून त्यांचं हसतंखेळतं कुटुंब दिसत आहे. छोट्या गावातील या गृहिणीचा स्वप्न पूर्ण करण्याचा प्रवास तिला कुठंवर घेऊन जातो, हे चित्रपट पाहिल्यावरच कळेल.

# आदित्यला व्हायचं होतं क्रिकेटर, पण नशीब फिरलं आणि..



२०१३ मध्ये रिलीज झालेल्या 'आशिकी 2' या चित्रपटाने अनेकांच्या मनावर राज्य केले होते. हा चित्रपट इतका हिट झाला की त्यातल्या ' राहुल जयकर' म्हणजेच आदित्य रॉय कपूर ने अनेक तरूणींच्या मनावर राज्य केले. त्याच आदित्य रॉय कपूरचा आज वाढदिवस. त्यानिमित्ताने जाणून घेऊया एक खास बात.. बॉलिवूडमध्ये आपला ठसा उमटवणारा आदित्य रॉय कपूर हा चित्रपटसृष्टीतील सर्वोत्तम अभिनेत्यांपैकी एक आहे. आदित्य रॉय कपूर यांचा १६ नोव्हेंबर १९८५ मध्ये मुंबईमध्ये झाला. तो 37 वर्षांचा झाला आहे. आदित्य रॉय कपूर जरी आता त्याची ओळख एक अभिनेता म्हणून असली तरी त्याला खरं तर त्याला क्रिकेटर व्हायचे होते. त्याच्या फार कमी चाहत्यांना हे माहीत असेल.

# मेसी अन् रोनाल्डो अखेरचा खेळणार वर्ल्डकप?

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**




फुटबॉल जगतातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. मेसी अन् रोनाल्डो हे महान खेळाडू अखेरचा वर्ल्डकप खेळणार असल्याची माहिती समोर आली आहे. लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांनी आपापल्या क्लब संघांना अनेक विजेतेपद मिळवून दिले आहेत

अर्जेंटिनाने 44 वर्षांपासून वर्ल्ड कप ट्रॉफी जिंकलेली नाही. दरम्यान, दोनदा हा संघ विजेतेपदाच्या अगदी जवळ मात्र, अंतिम फेरीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. गेल्या वर्षी अर्जेंटिनाने कोपा अमेरिका कप जिंकला होता. अशा स्थितीत मेस्सी अर्जेंटिनाचा 44 वर्षांचा विजेतेपदाचा दुष्काळ संपवू शकेल, अशी अपेक्षा आहे. त्याचबरोबर रोनाल्डोचा संघ पोर्तुगालला एकदाही विश्वचषक ट्रॉफी जिंकता आलेली नाही.

त्यामुळे दोघेही विश्वचषक जिंकण्याच्या तयारीत आहेत. दरम्यान, दोघांच्या निवृत्तीची चर्चा अधिक रंगली आहे. त्यामागचे कारणही तसेच आहे. एका मुलाखतीदरम्यान, मेस्सीने आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. 'मला शारीरिकदृष्ट्या चांगले वाटत आहे, मला आशा आहे की विश्वचषकापूर्वीही माझा हंगाम चांगला जाईल. ही पहिली वेळ नव्हती, दुखापतीनंतर मी पुनरागमन केले आहे आणि आता मला बरे वाटत आहे. आता मी विश्वचषकाचे दिवस मोजत आहे, जसजशी वेळ जवळ येत आहे, तसतशी अस्वस्थता वाढत आहे. अशी खंत मेस्सीने व्यक्त केली होती.

तर एका मुलाखतीमध्ये रोनाल्डोने या वर्षी कतारमध्ये होणाऱ्या फिफा विश्वचषकानंतर 2024 मध्ये होणाऱ्या युरो कपमध्येही खेळण्याची इच्छा आहे. आणि त्यानंतर निवृत्तीचा विचार करेन. असे मत त्याने व्यक्त केला आहे.

फुटबॉल वर्ल्ड कप 2022 स्पर्धेला 20 नोव्हेंबरपासून सुरुवात

# सूर्याची बादशाहत कायम!

## विराट कोहली टॉप-10 मधून बाहेर

**ॲडलेड। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारताचा मधल्या फळीतील फलंदाज सूर्यकुमार यादवने ऑस्ट्रेलियात झालेल्या टी-20 विश्वचषकात शानदार कामगिरी केल्यानंतर ICC T20 फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान कायम राखले आहे. सूर्यकुमार टी-20 विश्वचषकाच्या सुपर 12 टप्प्यात पाच डावांत तीन अर्धशतकांसह अव्वल क्रमांकाचा फलंदाज ठरला होता.

सूर्यकुमार यादव करिअरमधील सर्वोत्तम 869 रेटिंग गुण मिळाले आहे. इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीत 14 धावावर बाद झाल्याने त्याची दहा गुणाने घसरण झाली आहे, परंतु त्यांनी अव्वल स्थान कायम आहे. टी-20 विश्वचषकात सर्वाधिक 296 धावा करणारा विराट कोहली पहिल्या 10 मधून बाहेर पडला असून तो 11व्या स्थानावर गेला आहे. भारताविरुद्धच्या उपांत्य सामन्यात इंग्लंडच्या ॲलेक्स हेल्सने 47 चेंडूत नाबाद 86 धावांची खेळी करत 22 स्थानांनी प्रगती करत 12 व्या स्थानावर पोहोचला




आहे. पाकिस्तानचा मोहम्मद रिझवान दुसऱ्या क्रमांकावर आणि दक्षिण आफ्रिकेचा एडन मार्कराम पाचव्या स्थानावर राहिला तर डेव्हन कॉनवे चौथ्या स्थानावर घसरला. गोलंदाजांमध्ये इंग्लंडच्या आदिल रशीदने पाच स्थानांची प्रगती करत तिसरे स्थान पटकावले आहे. उपांत्य फेरीत भारताविरुद्ध आणि अंतिम फेरीत पाकिस्तानविरुद्ध त्याने चांगली कामगिरी केली होती. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू आणि अंतिम फेरीतील सामनावीर ठरलेल्या सॅम करनने दोन स्थानांची प्रगती करत पाचव्या स्थानावर पोहोचला आहे.

**सूर्यकुमार यादव करिअरमधील सर्वोत्तम 869 रेटिंग गुण मिळाले आहे. इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीत 14 धावावर बाद झाल्याने त्याची दहा गुणाने घसरण झाली आहे, परंतु त्यांनी अव्वल स्थान कायम आहे. टी-20 विश्वचषकात सर्वाधिक 296 धावा करणारा विराट कोहली पहिल्या 10 मधून बाहेर पडला असून तो 11व्या स्थानावर गेला आहे. भारताविरुद्धच्या उपांत्य सामन्यात इंग्लंडच्या ॲलेक्स हेल्सने 47 चेंडूत नाबाद 86 धावांची खेळी करत 22 स्थानांनी प्रगती करत 12 व्या स्थानावर पोहोचला आहे. पाकिस्तानचा मोहम्मद रिझवान दुसऱ्या क्रमांकावर आणि दक्षिण आफ्रिकेचा एडन मार्कराम पाचव्या स्थानावर राहिला तर डेव्हन कॉनवे चौथ्या स्थानावर घसरला. गोलंदाजांमध्ये इंग्लंडच्या आदिल रशीदने पाच स्थानांची प्रगती करत तिसरे स्थान पटकावले आहे. उपांत्य फेरीत भारताविरुद्ध आणि अंतिम फेरीत पाकिस्तानविरुद्ध त्याने चांगली कामगिरी केली होती.**

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही